डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नित
हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा द्वारा संचलित

# शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण

ता. कळंब जि. उस्मानाबाद

राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## वार्षिक कार्यक्रम अहवाल

Sharadchandra Mahavidyalaya
College Code 184

कार्यक्रमाधिकारी
प्रा. अडसुळे एस. पी.

प्राचार्य
डॉ बिराजदार जी. डी.

सहकार्यक्रमाधिकारी
डॉ. खोंड एस.व्हि.

## सन २०१८ - १९

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नित

हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा व्दारा संचलित

# शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण

ता. कळंब जि. उस्मानाबाद

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक कार्यक्रम अहवाल – 2018–19

मी राष्ट्रीय सेवा योजना या विभागाचा प्रमुख म्हणुन आपल्या समोर वार्षिक नियमित कार्यक्रम अहवाल सादर करीत आहे.

प्राचार्य डॉ. जी.डी. बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने घेण्यास सांगितलेले नियमित कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना' विभागाच्या वतीने महाविद्यालयात व महाविद्यालय परिसरात घेण्यात आले ते पुढील प्रमाणे.

'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाच्या वतीने दिनांक २१ जून–२०१८ वार बुधवार या दिवशी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. साजेद चाऊस हे उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून योग शिक्षक श्री फावडे सर हे कळंब येथून उपस्थित होते त्यांनी सर्वप्रथम निरोगी जीवनासाठी योगा याची गरज या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर वेगवेगळ्या योगांचे प्रकार सांगून प्रात्यक्षिके करून दाखवून दिले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद तसेच विद्यार्थी यांनी याचा मोठ्या प्रमाणात फायदा करून घेतला. शेवटी कार्यक्रमाधिकारी प्रा. एस. पी. अडसुळे. यांनी आभार मानले.

दिनांक ०१ ते १५ जूलै–२०१८ या कालावधीत वन महोत्सव पंधरवाडा साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बिराजदार जी.डी उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थिती सय्यद शाहेदा मॅडम (बार्टी समता दुत), डॉ. अलटे एस. एम. कार्यक्रमाधिकारी प्रा. अडसुळे एस. पी., सहकार्यक्रमाधिकारी डॉ. खोंड एस. व्हि. हरितसेना प्रमुख प्रा. शिरमाळे एम. बी. उपस्थित होते. वन महोत्सव पंधरवाडयामध्ये महाविद्यालयातील परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच महाविद्यालयाला येणाऱ्यामुख्य रस्त्यावर देखील दोन्ही बाजूने वृक्षारोपण करण्यात आले. तसेच आपल्या जीवनात वृक्षांचे महत्व, त्यांचे संवर्धन, जतन, जोपासना या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून महत्व सांगण्यात आले. आपल्या गांवातील, गल्लीतील आपला परिसर हा सुंदर दिसावा यासाठी आपण वृक्ष लागवड केली पाहिजे आणि यानी लोकजागृती केली पाहिजे असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

महाविद्यालयात दिनांक ०१ ऑगस्ट –२०१८ रोजी वार बुधवार या दिवशी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, जयंती आणि लोकमान्य टिळक स्मृतीदिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. घोलप के. जी. तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. डॉ. सय्यद ए. एफ. व शिरमाळे एम. बी. उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन, प्रा. अडसुळे एस.पी. यांनी केले.

दिनांक १५ ऑगस्ट –२०१८ वार बुधवार या दिवशी महाविद्यालयात सकाळी ठिक ८:०५ वाजता प्राचार्य डॉ. जी.डी. बिराजदार यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर

कार्यक्रमाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी सर्वाच्या हस्ते महाविद्यालयातील प्रांगणावर वृक्षरोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यानंतर एक स्वयंसेवक एक वृक्ष संवर्धन प्रत्येक स्वयंसेवकांना वाटप करण्यात आले.

दिनांक २३ ऑगस्ट –२०१७ वार गुरूवार या दिवशी महाविद्यालयातील प्रांगणावर सकाळी ठिक ८:०५ वाजता विद्यापीठ वर्धापन दिनाचा ध्वजारोहणचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचा प्राचार्य डॉ. जी.डी. बिराजदार यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी डॉ. साजेद चाऊस, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक २६ ऑगस्ट –२०१८ रोजी महाविद्यालयात रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जी.डी. बिराजदार, डॉ. साजेद चाऊस, कार्यक्रमाधिकारी प्रा. अडसुळे एस. पी., सहकार्यक्रमाधिकारी डॉ. खोंड एस.व्हि. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी यांना मुलींकडून राख्या बांधण्यात आल्या. तसेच वृक्षांचे जतन व्हावे या हेतूने वृक्षांना देखील राख्या बांधण्यात आल्या. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन त्या ठिकाणी वैद्यकिय अधिकारी डॉ. सुधीर जोगदंड व त्यांचा सर्व स्टॉफ तसेच त्या ठिकाणी उपचारास आलेल्या रूग्नांना देखील राख्या बांधण्यात आल्या. तेथून ग्रामिण पोलीस ठाणे' शिराढोण येथे जाऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक मा. शेख साहेब व त्यांच्या सर्व स्टॉफना राख्या बांधण्यात आल्या.

महाविद्यालयात दिनांक ०५ सप्टेंबर –२०१८ रोजी शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.डी. बिराजदार हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. डॉ. अकबर सय्यद हे उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. प्रत्येक प्राध्यापकांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांनी केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कुमारी प्राजक्ता कोंडेकर तर आभार डॉ. खोंड एस. व्हि. यांनी मानले.

महाविद्यालयात दिनांक १७ सप्टेंबर–२०१८ रोजी 'मराठवाडा मुक्ती संग्राम' दिनांचा ध्वजारोहणाचा कार्यक्रम सकाळी ठिक ८:०५ वाजता प्रांगणावर संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. जी. डी. बिराजदार हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. घोलप के.जी. हे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. खोंड एस. व्हि . तर आभार प्रा. डॉ. दळवे एस. एम. यांनी मानले.

दिनांक २४ ते ३० सप्टेंबर –२०१८ रोजी महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी.डी. बिराजदार हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक डॉ. अकबर सय्यद उपस्थित होते. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्टे, कार्य करण्याची पध्दत व महत्व याबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आले. या स्वच्छता मोहिमेत कार्यक्रमाधिकारी प्रा. अडसूळे एस.पी. सहकार्यक्रमाधिकारी डॉ. खोंड एस. व्हि. तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयात दिनांक २ ते १० आक्टोबर –२०१८ रोजी सकाळी ठिक ९:०० वाजता आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन 'म.गांधी' व लालबहाद्दुर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक ५ आक्टोबर –२०१८ वार शुक्रवार या दिवशी महाविद्यालय व महाविद्यालय परीसरात विभागाच्या वतीने 'स्वच्छता अभियान' राबविण्यात आले. प्रांगणावरील गाजर गवत, स्वच्छता, केरकचरा परीसरातील साफ–सफाई इत्यादी स्वच्छ करण्यात आले. या स्वच्छता

अभियानात प्रा. अडसूळे एस.पी., डॉ. खोंड एस. व्हि., डॉ. शेख अकबर, प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक २६ नोव्हेंबर –२०१८ रोजी महाविद्यालयात 'संविधान गौरव दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी.डी बिराजदार हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. चंदनशिवे एस.के. डॉ. अलटे एस.एम. हे उपस्थित होते. प्रमुख पाहूणे यांनी संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला तसेच डॉ. बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेसाठी दिलेले योगदान यावर सखोल असे मार्गदर्शन केले. तसेच यांनी देखील बोलताना स्वातंत्र्य, समता, बंधुता, व धर्मनिरपेक्षता यानी जाणीव प्रत्येक तरूण वर्गाला करून देण्याची गरज आहे. असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. बिराजदार यांनी संविधान हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहे. त्याचा आपण स्विकार करून त्यानुसार चालले पाहिजे असे बोलले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. खोंड एस.व्हि. यांनी केले. तर आभार प्रा. अडसुळे एस. पी. यांनी मानले. या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयात दिनांक २८ नोव्हेंबर –२०१८ रोजी म. फुले यांची पुण्यतिथी साजरा करण्यात आली आणि त्यांना सर्वांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला कार्यक्रमाधिकारी प्रा. अडसुळे एस.पी. सहकार्यक्रमाधिकारी डॉ. खोंड एस.व्हि. प्रा. डॉ. घोलप के. जी., प्रा. डॉ. शेख ए.आय., डॉ. दळवे एस.एम., डॉ. शकीलोधीन काझी, डॉ. अत्तार ए.एच., डॉ. साळुंके जे.डी., डॉ. सय्यद ए.एफ. आणि स्वयंसेवक उपस्थित होते.

दिनांक ०१ डिसेंबर –२०१८ रोजी महाविद्यालयात 'जागतिक एड्स दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. घोलप के.जी. हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे डॉ. शेख ए.आय. हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मागदर्शनात एड्स हा संसर्गजन्य आजार नसून एड्सग्रस्तांच्या मदतीला आपण पुढे गेले पाहिजे असे मत व्यक्त केले. तसेच डॉ. दळवे सर यांनी आज लोकसंख्या वाढत आहे. त्यानुसार एड्सग्रस्तांचे प्रमाण देखील वाढत आहे. आपल्या देशातून या रोगाचा नायनाट झाला पाहिजे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहकार्यक्रमाधिकारी डॉ. खोंड एस.व्हि. यांनी केले. तर आभार प्रा. अडसुळे एस.पी. यांनी मानले. कर्यक्रमाला प्राध्यापक वृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयात दिनांक ०६ डिसेंबर –२०१८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वानदिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी.डी.बिराजदार हे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. घोलप के.जी. हे उपस्थित होते. ते डॉ. बाबासाहेबांचे विचार विद्यार्थ्यां समोर ठेवले. तसेच त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या सामाजिक कार्याचा आढावा घेण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. साजेद चाऊस यांनी ही आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शिरमाळे एम.बी. यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. खोंड एस.व्हि. यांनी केले तर आभार प्रा. अडसुळे एस.पी. यांनी मानले या कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक २० डिसेंबर – २०१८ रोजी महाविद्यालयात 'संत गाडगेबाबा' यांची पुण्यतिथी साजरा करण्यात आली. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. जी.डी. बिराजदार, उपप्राचार्य डॉ. साजेद चाऊस प्रा. शिरमाळे एम.बी., प्रा. अडसुळे एस.पी., तसेच सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी 'संत गाडगेबाबा' यांचे प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

महाविद्यालय आणि विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १८ ते २४ जानेवारी –२०१९ च्या दरम्यान 'जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी विशेष युवक शिबीर' मौजे दाभा ता.कळंब जि. उस्मानाबाद या ठिकाणी आयोजित करण्यात आले. दाभा येथील या शिबीराचे पहिले वर्ष होते.

उद्घाटन व समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. डी. बिराजदार हे होते. उद्घाटक म्हणून प्रा.कमलाकर कवाडे (मराठी विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर) प्रमुख पाहुणे म्हणून प्रभारी प्राचार्य अनिल जगताप (छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब) उपप्राचार्य डॉ. साजेद चाऊस, सरपंच पार्वतीबाई शेवते, पोलीस पाटील रावसाहेब टेळे व प्राध्यापक वृंद इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन सहकार्यक्रमाधिकारी डॉ. खोंड एस. व्हि. यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. अडसुळे एस. पी. यांनी मानले.

२५ जानेवारी २०१९राष्ट्रीय मतदार दिन पंधरवाडा म्हणुन साजरा करण्यात आला. निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा वेगवेगळ्या स्पर्धेच्या माध्यमातुन जनजागृती करण्यात आली.

२६ जानेवारी २०१९ वार शनिवार या दिवशी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनाचा ध्वजारोहनाचा कार्यक्रम सकाळी ठिक ०८:०५ वा प्राचार्य डॉ. जि. डी बिराजदार यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले या वेळी डॉ. साजेद चाऊस सर, डॉ. सय्यद आर. आर व प्राध्यापक कर्मचारी उपस्थित होते.

वरिल सर्व वार्षिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. जी. डी. बिराजदार, उपप्राचार्य डॉ. साजेद चाऊस यांचे सतत योगदान तसेच कार्यक्रम घेण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच सहकार्यक्रमाधिकारी डॉ. खोंड एस. व्हि. व महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी प्राध्यापक मित्र व कर्मचारी यांनी मला वेळोवेळी सहकार्य केले. त्यावद्दल त्यांचे मी कार्यक्रमाधिकारी या नात्याने सर्वांचे धन्यवाद मानतो. त्याच बरोबर माझे स्वयंसेवक प्रत्येक कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला आणि कार्यक्रम यशस्वी पार पाडले त्याबद्दल त्यांचे देखील धन्यवाद मानतो. मला पूर्ण खात्री आहे या कार्यक्रमाच्या माध्यमातून माझा स्वंयसेवक हा सामाजिक कार्यकर्ता, देशाचा एक चांगला नागरीक म्हणून नक्की पुढे येईल,अशी आशा बाळगतो.

धन्यवाद.......................

कार्यक्रमाधिकारी

प्राचार्य

प्रा.अडसुळे एस. पी.
N.S.S. Prog. Officer
Sharadchandra Mahavidyalay,Shiradhon
Tq.Kallamb,Dist.Osmanabad

डॉ. बिराजदारजी. डी.
PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalay
Shiradhon Tq.Kallam

College Code 184


# वार्षिक कार्यक्रमाचे फोटो खालीलप्रमाणे







College Code
184







College Code
121











haradchandra Mahavidyalay
College Code
134

